**BDC LIBRARY**

**News Paper Clipping**

**A.Y. 2025-26**

# पाटण महोत्सवामुळे शेतकरी, व्यावसायिक, उद्योजक, बचतगट, नागरिकांना व्यासपीठ मिळणार : याज्ञसेन पाटणकर

▲पाटण, दि. २६ : पाटण महोत्सवाचा मुख्य उद्देश शेती-उद्योग-नवऊर्जा-स्वयंरोजगार या सर्व घटकांना एकत्र जोडून स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणे आहे. माहिती, तंत्रज्ञान व बाजारपेठ यांचा सेतू उभारून शेतकरी व उद्योजकांचे उत्पन्न वाढवणे तसेच नागरिकांना विश्वासार्ह व दर्जेदार स्थानिक उत्पादने उपलब्ध करून देणे हीच या महोत्सवाची खास ओळख ठरणार आहे. या माध्यमातून शेतकरी, छोटे-मोठे व्यावसायिक, उद्योजक, बचतगट आणि सर्वसामान्य नागरिकांना स्वतंत्र व्यासपीठ मिळणार आहे. महोत्सवात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक श्रीमंत याज्ञसेन पाटणकर यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केले.

पाटणमध्ये कोयना एज्युकेशन सोसायटी, बा. दे. कॉलेज, पाटण (आयक्युएसी) आणि रोटरी क्लब, पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २८ फेब्रुवारी ते दि. २ मार्च या कालावधीत पाटण महोत्सवाचे आयोजन केले आहे. याबाबत माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी प्र. प्राचार्य तथा संयोजन समितीचे चेअरमन डॉ. विलासराव कळंत्रे, समन्वयक डॉ. हेमलता काटे, सचिव विजय काटे, सदस्य डॉ. दीपक पाटील, डॉ. विनायक राऊत, डॉ. संतोष पाटील, शिवहर आंबेगावे, अनिल पाटील, विनायक माथने, सतीश गायकवाड, डॉ. प्रशांत फडणीस उपस्थित होते.



श्रीमंत याज्ञसेन पाटणकर पुढे म्हणाले, यातून स्थानिकांना रोजगार मिळणार आहे. महोत्सवात येण्यासाठी कोणतेही चार्जेस नाहीत. २० टक्के गाळे बचत गटांसाठी, विद्यार्थ्यांसाठी मोफत दिले आहेत. महाविद्यालयाच्या यंत्रणेमार्फत सर्व चोख नियोजन केले आहे. हे पहिलेच वर्ष असल्याने कमीत कमी खर्चात कसे चांगले करता येईल असा आमचा प्रयत्न आहे. या महोत्सवात भात, नाचणीसह विविध धान्यांचे प्रदर्शन आणि थेट विक्रीची व्यवस्था करण्यात आली आहे. सुधारित बियाणे, सेंद्रिय शेती, काढणीपश्चात प्रक्रिया आणि बाजारपेठेतील संधींबाबत मार्गदर्शन मिळणार आहे. स्थानिक शेतकऱ्यांना आपल्या उत्पादनांची थेट विक्री करता येणार असल्याने मध्यस्थांचा खर्च कमी होऊन उत्पन्नवाढीचा मार्ग खुला होणार आहे. आधुनिक शेती अवजारे, लघुउद्योगातील नावीन्यपूर्ण उत्पादने आणि सौरऊर्जा उपाययोजना यांचे सादरीकरण येथे पहायला मिळेल. खर्च कमी करून उत्पादन वाढविणारे पर्याय, सोलर पंप-पॅनल्ससारखी तंत्रे तसेच ग्रामीण उद्योजकतेला चालना देणारी उत्पादने यामुळे शेतकरी व नवउद्योजकांना प्रत्यक्ष माहिती व व्यवहार्य पर्याय मिळणार आहेत. महिला बचत गटांनी तयार केलेली हस्तकला, घरगुती प्रक्रिया उत्पादने, मसाले, पापड-लोणची यांसह विविध वस्तूंचे भव्य प्रदर्शन व विक्री येथे होणार आहे. त्याचबरोबर स्थानिक चवीचे खाद्यपदार्थ नागरिकांना चाखायला मिळणार असून दर्जेदार स्थानिक उत्पादनांना थेट बाजारपेठ मिळेल. महोत्सवात येणाऱ्या लोकांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन केले आहे.

महोत्सवात शेतकरी, उद्योजक, बचत गट आणि सर्वसामान्य नागरिकांना शेती, उद्योग, नवऊर्जा व स्थानिक उत्पादनांची प्रत्यक्ष माहिती मिळणार आहे. खरेदी-विक्रीसाठी एकाच ठिकाणी नवीन उद्योजक, विद्यार्थी यांना व्यापक व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. पाटण तालुक्यातील सर्व शाळातील शिक्षकांनी, मुलांनी भेट देऊन नवनवीन संकल्पना आत्मसात कराव्यात. नागरिकांनीही कुटुंबासह उपस्थित राहून पाटण महोत्सवाला भेट द्यावी. खरेदी-विक्रीत सहभागी व्हावे आणि या लोकाभिमुख उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असे आवाहन त्यांनी शेवटी बोलताना केले.

यावेळी समन्वयक डॉ. हेमलता काटे यांनी पाटण महोत्सवाची माहिती दिली. प्राचार्य तथा संयोजन समितीचे चेअरमन डॉ. विलासराव कळंत्रे यांनी स्वागत केले व आभार मानले.